दुरध्वनी क्र. 07132-222184
ई-मेल : ccfgad@gmail.com
ccftgadchiroli@mahaforest.gov.in

महाराष्ट्र शासन
वनविभाग
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचे कार्यालय.**
वन प्रशासकिय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली, 442605 महाराष्ट्र राज्य

क्रमांक : कक्ष-1(3)/आस्था/वनपाल पदोन्नती/24-25/ 102 गडचिरोली, दिनांक : 09/07/2025

: **आदेश** :

**विषय:- वनरक्षक संवर्गातून वनपाल संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत. (पदोन्नती वर्ष 2024-25).**

**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमाक : बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 07 मे, 2021

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 07 मे, 2021 मधील तरतूदीनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र. 28306/2017 या प्रकरणी अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दिनांक 25.5.2004 रोजीच्या सेवा जेष्ठतेच्या स्थितीनुसार **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** भरण्यात यावीत असे निर्देशीत केलेले आहे. त्यानुसार **तत्कालीन दक्षिण चंद्रपूर वनवृत्ताचे आस्थापनेवरील वनरक्षक (गट-क)** या पदावरुन **वनपाल (गट-क)** या पदावर **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नती देण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक 15.01.2025 रोजी संपन्न झालेली आहे.

2.00 विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पदोन्नतीस पात्र ठरविण्यात आलेल्या **खालील वनरक्षक यांना वनपाल या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती** देण्यात येत असून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर एस-9 : 26400-83600 या सुधारीत वेतनश्रेणीत **पदोन्नतीने पदस्थापना** त्यांचे नांवासमोर नमुद केलेल्या विभागात **खालील अटी व शर्तीचे अधिन** राहून करण्यात येत आहे.

| अ. क्र. | निवड सुचीतील जे.क्र. | वनरक्षकाचे नांव | कार्यरत वनविभाग | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीवर पदस्थापना केलेले पद | वनविभाग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 36 | श्री. पांडुरंग सोमाजी कोवासे | गडचिरोली | खुला | डेपो वनपाल, धानोरा दक्षिण धानोरा परिक्षेत्र | गडचिरोली | दि. 31.07.2025 रोजी रिक्त होणा-या पदावर |
| 2 | 38 | श्री. सुधाकर भाऊजी झाडे | आलापल्ली | खुला | क्षेत्र सहाय्यक, मक्केपल्ली घोट परिक्षेत्र | आलापल्ली | रिक्त पदावर |
| 3 | 39 | श्री. गौरव भाऊराव हेमके | गडचिरोली | खुला | क्षेत्र सहाय्यक, तेरादो आलापल्ली परिक्षेत्र | आलापल्ली | रिक्त पदावर |
| 4 | 40 | श्री. मधुकर शंकर निलम | गडचिरोली | खुला | विशेष सेवा वनपाल पेडीगुडम परिक्षेत्र | आलापल्ली | रिक्त पदावर |
| 5 | 41 | श्री. किसन सोमाजी कन्नाके | आलापल्ली | खुला | क्षेत्र सहाय्यक आलेंगा गटटा परिक्षेत्र | भामरागड | रिक्त पदावर |
| 6 | 42 | श्री. किशोर मारोती कन्नाके | आलापल्ली | खुला | वनपाल, जुना आगार बल्लारशाह | वाववि बल्लारशाह | रिक्त पदावर |
| 7 | 43 | श्री. बंडु धाडोसिंग राठोड | आलापल्ली | खुला | क्षेत्र सहाय्यक, एटापल्ली एटापल्ली परिक्षेत्र | भामरागड | रिक्त पदावर |
| 8 | 44 | श्री. रुपेश शंकरराव आनंदपवार | गडचिरोली | खुला | क्षेत्र सहाय्यक, कसुरवाही कसनसुर परिक्षेत्र | भामरागड | रिक्त पदावर |
| 9 | 45 | श्री. कैलास राजाराम डोंगरे | वडसा | खुला | क्षेत्र सहाय्यक, गोठणगांव कुरखेडा परिक्षेत्र | वडसा | दि. 31.07.2025 रोजी रिक्त होणा-या पदावर |
| 10 | 46 | श्री. अशोक मोहन मडावी | आलापल्ली | खुला | क्षेत्र सहाय्यक, बुर्गी एटापल्ली परिक्षेत्र | भामरागड | रिक्त पदावर |
| 11 | 47 | श्री. प्रकाश पुनाजी मेश्राम | का.आ. गडचिरोली | खुला | विशेष सेवा वनपाल, पिरमिली परिक्षेत्र | आलापल्ली | दि. 31.07.2025 रोजी रिक्त होणा-या पदावर |



Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती

1) संबंधितांना देण्यात येत असलेली पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक ; बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब, दिनांक 7 मे, 2021 च्या निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे. उक्त पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्रमांक : 28306/2017 वरील अंतिम निर्णयाचे अधिन असतील. तसेच सदर पदोन्नती वनपाल संवर्गातील काही दावे/याचिका दाखल केल्या/झाल्या असल्यास सदर प्रलंबीत याचिकांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहतील.
2) सदर पदोन्नती या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने पदोन्नत कर्मचारी यांना वनपाल पदावर सेवाजेष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही. ज्यावेळी सदर पदोन्नत्या नियमित होतील, तेव्हापासून त्यांची वनपाल पदावरील जेष्ठता निर्धारीत करण्यात येईल.
3) ही पदोन्नती देण्यात येणा-या वनरक्षकांचा वनपाल संवर्गामधील पदावर कोणताही धारणाधिकार राहणार नाही. तथापी वनपाल संवर्गाच्या सर्व सेवा शर्ती त्यांना बंधनकारक राहतील.
4) जर वनपाल संवर्गातील अस्थाई पदांना शासनाने यानंतर मंजूरी दिली नाही तर त्यांना कुठलेही कारण न देता परत वनरक्षक पदावर पदावनत केले जाईल.
5) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 12.9.2016 मधील तरतुदीनुसार एखादया कर्मचा-याने पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शविल्यास त्या कर्मचा-याचे नांव पदोन्नतीसाठी पात्र असणा-या कर्मचा-यांचे निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल आणि यापुढे होणा-या 2 निवडसूची वर्षामध्ये संबंधित कर्मचा-याचे नावाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच आश्वासीत प्रगती योजना अंतर्गत दिलेले लाभ काढून टाकण्यात येतील, मात्र दिलेल्या लाभाची वसूली करण्यात येणार नाही.
6) या पदोन्नतीमुळे त्यांची वनपाल संवर्गातील वेतन निश्चिती करतांना जर त्यांना यापूर्वी वनरक्षक पदावर असतांना कालबध्द/ आश्वासीत प्रगती योजना अंतर्गत वनपालाचे वेतन मंजूर केले असेल तर त्यांना फेर वेतन निश्चितीचा व वाढीव वेतनाचा फायदा मिळणार नाही.
7) गडचिरोली व चंद्रपुर वनवृत्ताच्या पुर्नरगठनामुळे निर्माण झालेला सेवाजेष्ठतेच्या प्रश्नासंबंधी भविष्यात शासनाकडुन फेरबदलासंबधी आदेश प्राप्त झाल्यास त्याअनुषंगाने याव्दारे देण्यात आलेल्या पदोन्नतीचे आदेश रदद करुन पदावनत करण्यात येईल.
8) वनवृत्ताचे पुनर्रचनेमुळे मागासवर्ग कक्ष नागपुर यांचेकडुन प्रमाणीत केलेल्या बिंदु नामावलीनुसार आरक्षीत पदामध्ये काही फेरबदल झाल्यास देण्यात आलेले पदोन्नतीचे आदेश रदद करुन पदावनत करण्यात येईल.
9) वनवृत्ताचे पुनर्रचनेमुळे सेवाजेष्ठतेच्या संदर्भात काही न्यायालयीन पेचप्रसंग उदभवल्यास सदर आदेशान्वये देण्यात आलेली पदोन्नती रदद करुन पदावनत करण्यात येईल.
10) सदर पदोन्नती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण तसेच मा. उच्च न्यायालय, मा. सर्वोच्च न्यायालय इ. ठिकाणी वनपाल संवर्गातील जेष्ठतेबाबत काही दावे/याचिका दाखल केलेल्या असल्यास/भविष्यात दाखल झाल्यास सदर याचिकांच्या निकालाचे अधिन राहील.
11) विभागीय पदोन्नती समिती समक्ष ठेवण्यात आलेला कोणताही सेवा तपशिल चुकीचा असल्याचे भविष्यात आढळून आल्यास देण्यात आलेली पदोन्नती रद्द करुन सक्तीने सेवानिवृत्त/सेवेतून काढून टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.
12) वरील वनरक्षकांनी एतदर्थ मंडळाची हिंदी/मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण केली नसल्याचे/उत्तीर्ण होण्यापासून सुट दिली नसल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास पदोन्नती आदेश रद्द करुन पदावनत करण्यात येईल.
13) शासन निर्णय दि. 2 जून, 2014 अन्वये संबंधितांनी मत्ता व दायित्वे विवरण कार्यालय प्रमुख्य यांचेकडे सादर केले नसल्याचे निदर्शनास आल्यास पदोन्नती आदेश रद्द करुन पदावनत करण्यात येईल.
14) साप्रवि शासन परिपत्रक क्र.सीडीआर-1005/प्र.क्र.1/05/11, दिनांक 30.10.2006 नुसार कर्मचा-याचे नांव संशयास्पद सचोटीच्या यादीमध्ये असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना पदावनत करण्यात येईल.
15) वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे संमतीपत्र प्राप्त करुन संबंधिताचे सेवापुस्तकामध्ये जतन करावे. तसेच याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**3.00 संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी उपरोक्त पदोन्नत कर्मचारी यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी/ फौजदारी प्रकरण अन्वेषनाधिन अथवा प्रलंबीत नाही अथवा संबंधित कर्मचारी शिक्षेच्या अंमलाखाली नाही याबाबतची खातरजमा करुनच सदर आदेशाची अंमलबजावणी करावी. असे निदर्शनास आल्यास तात्काळ या कार्यालयास अवगत करावे.**

**4.00 शासन निर्णय, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-10/2003/प्र.क्र.91/मावक-5, दिनांक 8.12.2003 अन्वये मागाव प्रवर्गातील उमेदवारकरीता राखीव असलेल्या पदावर निवड केलेल्या उमेदवारांचे जात वैधता पडताळणी प्रमाणपत्राची तपासणी करुनच त्यांना पदोन्नतीचे पदावर रुजू करुन घेण्याबाबतची दक्षता संबंधित नियंत्रण अधिका-यांनी घ्यावी.**



Scanned with OKEN Scanner

5.00 सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील. संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी उक्त शासकीय सेवकांना त्यांचे पदोन्नतीचे पदावर रुजू होण्यासाठी स्थानिक व्यवस्था करुन संबंधित वनरक्षक यांना तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधिताचा रुजू दिनांक या कार्यालयास कळवावा. पदोन्नतीनंतर संबंधित कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होत नसेल तर अशा कर्मचा-या विरुध्द सक्षम प्राधिकारी यांनी नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

6.00 सदर पदोन्नती व पदस्थापना ही संपूर्णपणे प्रशासकीय स्वरुपाची बाब असल्यामुळे कोणत्याही कर्मचा-याने पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणेबाबत राजकीय दबाव वापरल्यास त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,1981 मधील नियम 23 चा भंग केला म्हणून ती कृती शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील.

(एस. रमेश कुमार)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
गडचिरोली.

प्रति,

वरीलप्रमाणे पदोन्नत वनरक्षक
**मार्फत** : संबंधित नियंत्रक अधिकारी

**प्रतिलिपी** :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलिपी** :- वनसंरक्षक, वाहतुक व विपणन, बल्लारशाह यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत. वरील पदोन्नत वनपाल यांना पदोन्नतीचे पदावर रुजू करुन घ्यावे.
**प्रतिलिपी** :- उप वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली/वडसा/आलापल्ली/भामरागड/सिरोंचा वनविभाग/कार्य आयोजना, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत. वरील पदोन्नत वनपाल यांना स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व पदोन्नतीचे पदावर रुजू करुन घ्यावे.
**प्रतिलिपी** :- आदेश नस्ती/नियमित पदोन्नती नस्ती/बिंदू नामावली नस्तीकरीता.



Scanned with OKEN Scanner